R. T. M. NAGPUR UNIVERSITY, NAGPUR

GONDIA EDUCATION SOCIETY'S

# M.B.PATEL COLLEGE OF ARTS, COMMERCE & SCIENCE, SAKOLI - 441802

# NATIONAL SERVICE SCHEME (NSS)

## REGULAR ACTIVITIES
## COLLEGE LEVEL CAMP

## REPORTS, PHOTOS AND NEWS

YEAR 2023-2024

Program Officer
(Dr. Nutan Chouhan)

Principal
(Dr. C. J. Khune)

# रा.तू.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर
# एम.बी.पटेल महाविद्यालय, साकोली, जिल्हा – भंडारा
## वार्षिक संक्षिप्त अहवाल
## सत्र 2023–24

युवकांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासाठी मौलिक कार्य करणारा राष्ट्रीय सेवा योजना हा एक महत्वाचा उपक्रम आमच्या महाविद्यालयात सन 1972 पासून अव्याहपणे सुरू आहे. सत्र 2022–2023 मध्ये विद्यापीठाकडून अनुदानित 250 स्वयंसेवकांचे रासेयो पथक मंजूर झालेले असून ते कार्यरत आहे. या सत्रात श्री प्रवीण पुस्तोडे याची रासेयो विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून तर कु.पौर्णिमा शिवणकर हीची विद्यार्थीनी प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली.

रासेयो दोन पथकाच्या वतीने प्रा. डॉ.नूतन चौव्हान व प्रा.डॉ.बलदेव काकडे यांच्या नेतृत्वात या सत्रात खालीलप्रमाणे उपक्रम राबविण्यात आले.

### आंतरराष्ट्रीय योग दिन

21 जून 2023 ला रासेयो पथकातर्फे योग शिबीर प्राचार्य डॉ.सी.जे.खुणे यांच्या अध्यक्षतेत महाविद्यालयातील सर्व प्राध्यपक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांना योग व प्राणायमाचे प्रात्याक्षिक व प्रत्यक्ष योग शिकविण्यात आले.

### स्वच्छता अभियान

या सत्रात 16 जुलै 2023 ला रासेयो तर्फे 'स्वच्छता अभियान' महाविद्यालय परिसरात राबविण्यात आले.

### मेरी माटी मेरा देश अभियान

या सत्रात रासेयो तर्फे महाविद्यालय परिसर येथे 1 ऑगस्ट 2023 ला 'मेरी माटी मेरा देश' कार्यक्रम अंतर्गत 'पंचप्राण शपथ' घेण्यात आली. यात प्राचार्य डॉ.सी.जे.खुणे यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रीय सेवा योजना तसेच राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी फार मोठया संख्येत उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.नूतन चौव्हाण यांनी विद्यार्थ्यांना शपथ दिली यामध्ये महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक वृंद व कर्मचारी व (135 रासेयो स्वयंसेवक) उपस्थित होते.

## आंतराष्ट्रीय युवा दिवस

12 अगस्त 2023 ला 'आंतरराष्ट्रीय युवा दिन व रेडरिबन क्लब मार्फत तरूणांसाठी हरित क्रांती एचआयव्ही युवा व पर्यावरण हा कार्यक्रम राबविण्यात आलाण कार्यक्रमाचे अध्यक्ष रासेयोचे प्रमुख डॉ.नूतन चौव्हान हे होते. एचआयव्ही वर बंधात्मक उपयायोजना व पर्यावरणाचे महत्त्व आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना सांगितले तसेच कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.प्राची रणदिवे व प्रा.स्नेहा माने प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. 26 ऑगस्ट 2023 ला मेरी माटी मेरा देश अंतर्गत वसुंधरा वंदन हा कार्यक्रम घेण्यात आला.

28 ऑगस्ट 2023 ला 'वीरो को वंदन हे कार्यक्रम घेण्यात आले. 29 ऑगस्ट 2023 रोजी 'मातृभुमी ला वंदन' कार्यक्रम घेण्यात आले.

## मेरी माटी मेरा देश

'मेरी माटी मेरा देश' या थीम अनुसार 30 ऑगस्ट 2023 ला ''पैड़ो की रक्षा भाई बहन की सरूक्षा'' या अनुसार महाविद्यालयाच्या परिसरातील वृक्षांना 'राखी' बांधण्याचा कार्यक्रम घेण्यात आला. राखी बांधतांना वृक्षांचे संरक्षण करण्याचा संकल्प सर्व स्वंयसेव व शिक्षकांनी घेतला. या मध्ये कार्यक्रम अधिकारी डॉ.नूतन चौव्हाण यांच्या नेतृत्वात कार्यक्रम घेण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून डॉ.शंकर बागडे, डॉ.बलदेव काकडे, प्रा.विलास शिवनकर, प्रा. डि.बी.रंगारी तसेच रासेयो स्वंयसेवक मोठया संख्येत उपस्थित होते सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या घरून कृत्रिम प्रकारची राखी तयार करून महाविद्यालयातील वृक्षांना बांधले. निसर्गाची कुठल्याही वृक्षांना बांधले. निसर्गाची कुठल्याही प्रकारची नुकसान होणार नही याची दक्षता सर्व स्वंयसेवकांनी घेतली. राखी बांधते वेळी ''वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचो'' व ''पेड की रक्षा भाई बहन की सुरक्षा' असे नारे देऊन महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वृक्षांचे महत्व समाजावून सांगितले. कार्यक्रमात बहुसंख्येने स्वंयसेवक व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## स्वच्छता अभियान

24 सप्टेंबरला 2023 रोजी रसेयो दिन साजरा करण्यात आला व नगर परिषद साकोली द्वारे स्वच्छता रॅलीत रासेयो स्वंयसेवक सहभागी झाले.

दि. 01 ऑक्टोबर 2023 ला सकाळी 10 ते 11 या वेळी 'स्वच्छता अभियान राबविण्यात आले. प्राचार्य डॉ.सी.जे.खुणे व रासेयो क्रार्यक्रम अधिकारी डॉ.नूतन चौव्हान यांच्या नेतृत्वात महाविद्यालया पासून तर साकोलीतील बस स्थानक पर्यत संपूर्ण परिसर स्वच्छ केले. शासनाच्या निर्देशानुसार संपूर्ण देशभर हा कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये प्रा.डि.बी.रंगारी, विलास शिवनकर तसेच रासेयो स्वंयसेवक चेतन राठोड, प्रविण पुसतोडे, उत्कर्ष वासनिक, विशाल नेवारे, हार्दिक सिंगरे, सुमित खुणे, पौर्णिमा शिवनकर, थामेश्वरी, पुनम, आचल, अल्पिता, दिंव्या, शुभांगी, रूची इत्यादि रासौ स्वंयसेवकांनी उत्कृष्टपणे सहभाग घेतला. या स्वच्छता अभियानाला यशस्वी करण्यासाठी 65 स्वंयसेवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## सतर्कता जागरूकता सप्ताह

विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या निर्देशानुसार 30 ऑक्टोबर ते 5 नोव्हेंबर 2023 या कालावधीत "सतर्कता जागरूकता सप्ताह अंतर्गत" भ्रष्टाचार का विरोध करे राष्ट्र के प्रती समर्पित रहे" या शिर्षक अंतर्गत दि. 30 ऑक्टोबर 2023 ला प्राचार्य डॉ.सी.जे.खुणे यांच्या मार्गदर्शनात आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.नूतन चौव्हान यांच्या अध्यक्षते त हा कार्यक्रम घेण्यात आला. 'भ्रष्टाचार का विरोध करे राष्ट्र के प्रति समर्पिरत रहे" या शीर्षक अंर्गत वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंय सेवकांनी भाग घेतला. प्रा.संजय रोकडे, प्रा. संजय डोंगरे, प्रा.डि.बी.रंगारी, प्रा.ज्योती कान्हेकर, प्रा.तिरपुडे इत्यादि अतीथी म्हणून उपस्थित होते. आणि फार मोठया संख्येत रासेयो स्वंयसेवक उपस्थित होते.

## राष्ट्रीय एकता दिवस

दि. 31 ऑक्टोबर 2023 ला राष्ट्रीय एकता दिवस म्हणून भारत रत्न सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ.सी.जे.खुणे यांच्या मार्गदर्शनात आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.नूतन चौव्हाण यांच्या नेतृत्वात राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आल.

प्रमुख अतिथी म्हणून प्रा.विलास शिवनकर यांनी सरदार पटले यांच्या जीवनकार्यावर भाषण केले. स्वातंत्र्य संग्रामातील योगदान या वर प्रा.ज्योती कान्हेकर यांनी मार्गदर्शन केले प्राचार्य डॉ.सी.जे.खुणे यांनी सरदार पटेल यांच्या दूरदर्शीपणामुळे नव्या भारताची निर्मिती शक्य झाली व त्यांच्या जीवन कार्याव प्रकाश टाकला प्रमुख अतिथि म्हणून प्रा.मिलींद घोडीचोर, प्रा.डि. बी.रंगारी, प्रा.डोंगरे, प्रा.साखरे, प्रा.फुले, प्रा.गहाणे, प्रा.पडोले, प्रा.बडोले, प्रा.मोहतुरे, प्रा.माने, प्रा. तिरपुडे, इत्यादि उपस्थित होते. तसेच रासेयो स्वंयसेवक सुमित खुणे, उत्कर्ष वासनिक, नंदिनी राऊत, छबिला हटवार, शुभांगी अरसोडे, हर्षा बावनकर, चेतन राठोड इत्यादिनी सहकार्य केले.

## पथनाटय स्पर्धेत मनोहरभाई पटेल महाविद्यालयाने बाजी मारली

भारत सरकारच्या निर्देशानुसार स्वच्छता सर्वेक्षण 2023–24 च्या माध्यमातून आणि स्वच्छ भारत मिशन व माझी वसुंधरा अभियान अंतर शाळा व आंतर महाविद्यालयीन पथनाटय स्पर्धेचे आयोजन दि. 7 ऑक्टोबर 2023 ला  नगर परिषद साकोली येथे करण्यात आले होते. तालुका स्तरीय पथनाटय स्पर्धेत मनोहरभाई पटेल महाविद्यालयाने तृतीय क्रमांक पटका विला महाविद्यालयातील सहभागी विद्यार्थ्यांना मोमेंटो, सहभाग प्रमाणपत्र व 2000 रू. चा चेक देऊन सत्कार करण्यात आला. 1 नोव्हेंबर 2023 ला पुरस्कार मिळाला.

## जागतिक एड्स दिवस व एड्स पंधरवाडा साजरा

1 डिसेंबर ते 15 डिसेंबर 2023 दरम्यान जागतिक एड्स पंधरवाडा साजरा करण्यात आला. या वेळी रासेयो स्वंयसेवक व रेड रिबन क्लब च्या विद्यार्थ्यांनी उपजिल्हा रूग्णालय साकोलीच्या वतीने समुपदेशक जयश्री बंसोड यांचे व्याख्यान झाले. तसेच वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, निबंध स्पर्धा व पथनाटय स्पर्धा घेऊन जनजागृती करण्यात आली. 46 विद्यार्थी सहभागी झाले.

## मानव अधिकार दिवस

10 डिसेंबर 2023 ला आंतरराष्ट्रीय मानव अधिकार दिवस साजरा करण्यात येऊन मानव अधिकाराबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन परव्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

## राष्ट्रीय युवा दिवस

12 जानेवारी 2024 ला स्वामी विवेकनंद यांची जयंती राष्ट्रीय युवा दिन म्हणून महाविद्यालयात साजरी करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना, रेड रिबन क्लब आणि राज्यशास्त्र याद्वारे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. मान्यवरांनी स्वामी विवेकानंदाच्या जीवनावर प्रकाश टाकून युवकांनी त्यांचा आदर्श डोळयासमोर ठेवून त्यांच्या सारखी जीवन पध्दती अवलंबवावी असे आव्हान करण्यात आले.

## राष्ट्रीय मतदार दिवस

25 जानेवारी 2024 ला राष्ट्रीय मतदान दिवस साजरा करण्यात आला. राष्ट्रीय मतदान दिनाची शपथ विद्यार्थी व प्राध्यापक व कर्मचारी यांनी घेतला. तसेच महाविद्यालयापासून ते श्यामराव कापगते महाविद्यालयापासून ते श्यामराव बापू कापगते महाविद्यालय पर्यंत रैली चे आयोजन करण्यात आले. 105 रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

## आरोग्य शिबीर

17 फेब्रुवारी 2024 ला महाविद्यालयात भव्य आरोग्य शिबिराचे चे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरात आरोग्य तपासणी, रक्तगट तपासणी, रक्तदान, मधुमेह, दंत चिकित्सा, एचआयव्ही एड्स व सिकलसेल इत्यादि तपासण्या करण्यात आल्या या शिबीरात 250 लोकांनी आपल्या सहभाग नोंदविला. हे शिबीर उपजिल्हा रूग्णालय, साकोली यांच्या सहकार्याने पार पाडण्यात आले.

## विशेष सहभाग व पुरस्कार

1. चेतन राठोड, बी.ए. तृतीय वर्ष याची 2024 प्रजासत्ताक दिन परेड मुंबई करीता विद्यापीठा तर्फे निवड करण्यात आली. चेतन राठोड ने महाविद्यालयाचे मुंबईत प्रजासत्राक दिवसी 26 जानेवारी 2024 ला महाविद्यालयाचे नेतृत्त्व केले.
2. 25 जानेवारी ते 03 फेब्रुवारी 2024 ला राज्यस्तरीय आव्हान–आपती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे 2 स्वंयसेवकांनी सहभाग केले.

   1) सुमित खुणे 2) हिमांशु गणवीर
3. 12 फेब्रुवारी 2024 ते 18 फेब्रुवारी 2024 दरम्यान झालेल्या विद्यापीठ स्तरीय विशेष शिबीरात ता.मोहाडी येथील ग्रामपंचायत कान्हळगाव यात 4 स्वंयसेवकांनी सहभागत घेतला.
4. 22 मार्चला युवा रंग विद्यापीठ स्तरीय कार्यक्रमात हंसराज घवळ यांनी लावणी सादर केली.

## धर्मापुरी येथे विशेष सात दिवसीय शिबीर

दत्तक ग्राम धर्मापुरी येथे दिनांक 21 फेब्रुवारी ते 27 फेब्रुवारी 2024 दरम्यान जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धर्मापुरी येथे विशेष सात दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास या संकल्पनेवर आधारित शिबिरात विविध मार्गदर्शन पर कार्यक्रम घेण्यात आले.

विशेष म्हणजे मार्गदर्शनात ग्राम विकासात युवकांची भुमिका, ग्रामपंचायत सदस्य यांच्या व सरपंच यांच्या उपस्थितीत कार्यक्रम घेण्यात आले. मतदार जनजागृती (SVEEP) कार्यक्रम, दैनंदिन जीवनात रसायनांचा वापर, नैसर्गिक व सेंद्रिय शेती काळाची गरज इत्यादि विषयांवर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. या बरोबरच शिबीरात श्रमदानातून स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन कार्यक्रम राबविण्यात आले. तसेच सांस्कृतिक कार्यक्रम पथनाटयातून जनजागृती व मनोरंजन करण्यात आले.

### ऋणनिर्देश

2023.–24 या सत्रात रासेयो तर्फे घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांच्या यशस्वीतेसाठी ज्यांनी आम्हाला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मोलाचे सहकार्य केले ज्यामध्ये डॉ.सोपानदेव पिसे, संचालक रासेयो, रा.तू.म.नागपूर विद्यापीठ, प्राचार्य डॉ.सी.जे.खुणे, उपजिल्हा रूग्णालय साकोली, संपूर्ण प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी, धर्मापुरी ग्रामपंचायत व ग्रामवासी तसेच माझे सहकारी डॉ.किशोर नागपुरे, डॉ.बलदेव काकडे, प्रा.विलास शिवणकर, सर्व रासेयो स्वयंसेवक या सर्वांचे मी कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.नूतन चव्हाण मनापासून आभार व्यक्त करतो.

धन्यवाद

कार्यक्रम अधिकारी

दिनांक : 25-04-2024

प्रा. डॉ.नूतन चव्हाण

Dr. Nutan V. Chouhan
Programme Officer
Manoharbhai Patel College, Sakoli

**रा.तू.म.नागपूर विद्यापीठ, नागपूर**
**एम.बी.पटेल महाविद्यालय, साकोली, जिल्हा भंडारा**
**विशेष सात दिवसीय शिबीर अहवाल**
**सत्र 2023–24**

महाविद्यालयीन शिक्षणातून विद्यार्थ्यांची शैक्षणिक उन्नती करीत असतांनच परिसरातील गावांचा सामाजिक व सांस्कृतिक विकास हे ध्येय समोर ठेऊन राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास वाढीस लावण्याची जबाबदारी स्वीकारून रा.तू.म.नागपूर विद्यापीठ, नागपूर अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे दिनांक 21 फेब्रुवारी ते 27 फेब्रुवारी 2024 या दरमयान ''युवकांचा ध्यास ग्राम–शहर विकास'' या संकल्पनेवर आधारित दत्तक ग्राम धर्मापुरी येथे शिबीर आयोजित केल्या गेले. त्याचा संक्षिप्त अहवाल खालीलप्रमाणे आहे.

**दत्तक ग्राम धर्मापुरीचा संक्षिप्त इतिहास**

धर्मापुरी हे गाव साकोली वरून दक्षिणेस 4 कि.मी. अंतरावर असून चुलबंद नदीच्या किनाऱ्यावर वसलेले आहे. या गावाला पौरणिक महत्व असनू प्राचीन काळात येथे गवळयांची वसाहत असावी याचे अनेक पुरावे आढळले आहेत. येथे दरवर्षी 14 ते 16 जानेवारीला दुर्गाबाई होड या नावाने यात्रा भरवली जाते.

गावाची एकूण लोकसंख्या 1176 असून 582 पुरूष व 594 स्त्रिया आहेत. गावाचा मुख्य व्यवसाय शेती असून पशुपालन, मच्छीपालन, भाजी व्यवसाय व मजुरी हे जोड व्यवसाय आहेत. ग्राम पंचायत, सेवा सहकारी, संस्था या गावातील प्रमुख सार्वजनिक संस्था आहेत. गावात महिलांचे 12 बचत गट व पुरूषांचे 4 बचत गट आहेत. गावात पिण्याच्या पाण्यासाठी विहीर, कूपनलिका आहेत. या गावाला आमच्या महाविद्यालयाने दत्तक घेतलेले असून या गावी 7 दिवसीय विशेष शिबीर व वर्षभर नियमित एक दिवसीय शिबिराचे आयोजन केले जाते.

**शिबीर उभारणी**

दिनांक 21 फेब्रुवारी 2024 ला शिबिराची उभारणी करण्यात आली. या शिबिरात रासयोच्या एकूण 125 स्वयंसेवकांनी भाग घेतला होता. शिबिराच्या पहिल्याच दिवशी स्वयंसेवकांची नोंदणी, त्यांचे गट, सामानाची जमवाजमव, कामाची विभागणी व परिसराची स्वच्छता करण्यात आली.

## शिबिराचे उदघाटन

दिनांक 22 फेब्रुवारी 2024 ला दुपारी 12:00 वाजता मा.प्राचार्य डॉ.सी.जे.खुणे यांच्या अध्यक्ष ते खाली डॉ.सी.एम.टेंभुर्णीकर, डॉ.एस.बी.कापगते, मा.डॉ.अरविंद कटरे व सरपंच पुष्पा खोटेले यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. यावेळी ग्रामपंचायत सदस्यगण, प्राध्यापक वृंद व गावकरी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. शिबिराचे उदघाटन रासेयोच्या ध्वजारोहणाने व स्फुर्ती गीताने करण्यात आली. यावेळी मान्यवरांनी रासेयोचे महत्व व ग्राम विकासात युवकांची भूमिका यावर मार्गदर्शन केले.

## शिबिराचा सकाळ सत्र

शिबीर काळात दररोज सकाळी 5:30 ते 7:00 या दरम्यान प्रार्थना, योग–प्राणायम व व्यायाम घेण्यात येत होते. सकाळी 8:30 ते 11:30 दरम्यान श्रमसंस्कार शिबिरातून गावातील रस्त्यांची, नाल्यांची, पाणघाट, दुर्गाबाई डोह हे पर्यटन स्थळ, मंदिरे यांची साफ–सफाई व दुरूस्ती, वृक्षलागवड, वृक्षसंवर्धनाची कार्य याबरोबरच शाळेची साफसफाईचे कार्य करण्यात आले. विशेष म्हणजे शिबीर काळात प्लास्टिक निर्मूलनाचे कार्य मोठया प्रमाणात हाती घेण्यात आले होते.

## मार्गदर्शन कार्यक्रम

दुपारच्या सत्रात 2:00 ते 4:30 या दरम्यान विविध विषयावर मार्गदर्शनाचे कार्यक्रम घेण्यात आले. त्यात मतदार जनजागृती, दैनंदिन जिवनात रसोयनांचा वापर, नैसर्गिक व सेंद्रीय शेती काळाची गरज या विषयांवर डॉ.सी.एम.टेंभुर्णीकर, डॉ धिरज पाटील, प्रा. व्ही.बी.झंजाळ, श्री अनिल किरणापुरे, कु.रजनीगंधा टेंभुर्णे, रूपचंद खोटेले यांनी मार्गदर्शन करून स्वंयसेवकांसोबतच गावकरी, शेतकरी व महिलांना जागृत करण्याचे प्रयत्न करण्यात आले.

## सांस्कृतिक कार्यक्रम

रात्री 8:00 ते 10:00 या वेळात सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे मनोरंजनबरोबरच विविध विषयांवर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत होते. यात अंधश्रध्दा निर्मूलन, राष्ट्रीय एकात्मता, धर्मनिरपेक्षता, पर्यावरण, व्यसनमुक्ती, हागणदारीमुक्त गाव यावर कार्यक्रम सादर करून जनजागृती करण्यात आली.

## शिबीर समारोप

दिनांक 26 फेब्रुवारी 2024 ला दुपरी 2:00 वाजता प्राचार्य डॉ.सी.जे.खुणे यांच्या अध्यक्षतेत डॉ.एल.पी नागपुरकर, सरपंच पुष्पा खोटेले, उपसरपंच राजेश भेंडारकर, ग्रासेवक श्री नान्हे, ग्रापंचायत सदस्य अनिल खोटेले, मनोज टेकाम, रोहिणी कांबळे, जयश्री खरकाटे यांच्या उपस्थितीत शिबीर समारोीय कार्यक्रम पार पाडण्यात आले. या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ठ कार्य करणाऱ्यावर स्वयंसेवकांचा सत्कार करण्यात आला शिबीर समाप्ती करण्यात आली.
दिनांक 27 फेब्रुवारी 2024 रोजी शिबीराचे समाप्त.

## ऋणनिर्देश

हे विशेष सात दिवसीय शिबीर यशस्वी करण्यासाठी ज्यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत केली त्यांचा आभार मानने माझे कर्तव्य समजतो. डॉ.सोपानदेव पिसे रासेयो संचालक, रा.तू.म. नागपूर विद्यापीठ नागपूर, प्राचार्य डॉ.सी.जे.खुणे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य केले त्यांचे मनःपूर्वक आभार. तसेच शिबिरात मार्गदर्शन करणारे मार्गदर्शक, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, शाळेचे शिक्षकवृंद, अंगणवाडीका सेविका व मदतनीस, गावकरी, सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तरी कर्मचारी, सर्व रासेयो स्वंयसेवक तसेच माझो सर्व सहकारी डॉ.बलदेव काकडे, प्रा.वैष्णवी झंझाड, प्रा.विलास शिवणकर, प्रा.मिलिंद घोडीचोर, प्रा.सरिता बैस, प्रा.ज्योत्स्ना कान्हेकर, प्रा.संजय डोंगरे, प्रा.दिशांत रंगारी, प्रा.संजय रोकडे, प्रा.गहाणे, प्रा.दिघोरे, प्रा.लांजेवार, प्रा.बाळबुध्दे, श्री दिनेश कापगते, श्री मुंगमोळे, यांनी शिबीर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले या सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

N.V.Chouhan.

कार्यक्रम अधिकारी

दिनांक : 25-04-2024

प्रा.डॉ.नुतन चव्हाण

Dr. Nutan V. Chouhan
Programme Officer
...rbhai Patel College, Sakoli